## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

---

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**क्र. रामाआ-नाशिक/तक्रार क्र :१५७/२०२३/अहिल्यानगर**

| तक्रारदार | प्रतिवादी |
|---|---|
| श्री. महेश एस. शिरसाठ,<br>रा. कृष्णा प्राइड ३, अकोले<br>बायपास रोड, मु. पो. ता. संगमनेर,<br>जि. अहिल्यानगर-४२२१०५. | वनक्षेत्रपाल,<br>सामाजिक वनीकरण, शेवगाव यांचे<br>कार्यालय, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत,<br>अहिल्यानगर रोड, शेवगाव, ता. शेवगाव,<br>जि. अहिल्यानगर-४१४५०२. |

**सुनावणी दिनांक १६/०१/२०२५**

तक्रारदार यांनी दिनांक १५/०२/२०२३ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे. त्यामध्ये दिनांक १६/०१/२०२५ रोजी आयोजित सुनावणीसाठी तक्रारदार उपस्थित असून संबंधित जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

२) तक्रारदार यांनी दिनांक १५/०२/२०२३ रोजीच्या तक्रार अर्जात नमुद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपुर्ण माहिती पाठविली आहे व विलंबाने पत्र पाठवून दिशाभूल केली आहे.

३) तक्रारदार यांनी दि. २८/१०/२०२२ च्या माहिती अर्जान्वये १ एप्रिल २०२० ते दिनांक ३१ ऑक्टो २०२२ पावेतो १) उपरोक्त कालावधीत आपल्या अखत्यारीत (राज्य योजनेतंर्गत) रस्ता दुतर्फा व इतर नियोजित जागेवर करण्यात आलेल्या वृक्षलागवड कामांची माहिती तसेच त्या कामांकरीता व त्यावरील संगोपणावर झालेल्या खर्च तसेच संबंधीतास अदा करणेत आलेल्या रकमेची आरटिजीएस चे कॉपी/देयकांची झेरॉक्स कॉपी साक्षांकित करुन मिळावी. तसेच वरील कालावधीत आपल्या अखत्यारीत असलेल्या मजुर, वॉचमन यांची नावे, मजुरी दिवस, कामाचे ठिकाण आदीसह त्यांना आजपावेतो रोखीने अथवा बँकेद्वारे अदा केलेल्या रकमेची माहिती मिळावी. २) शेवगाव तालुक्यातील राज्य योजनेतंगैत रस्ता, दुतर्फा वृक्ष लागवड कामांचे (संरक्षण व मजुरी) अंतर्गत काम केलेल्या मजुर सोसायट्याची नावे मिळावी. अशी माहिती मागितल्याचे दिसून येते.

३) सुनावणीवेळी उपलब्ध असलेली कागदपत्रे विचारात घेता, जन माहिती अधिकारी यांनी तक्रारदार यांना दि. ०१/११/२०२२ च्या पत्रान्वये एका मुद्याची माहिती दिली आहे. विचारणा करण्यात आलेली माहिती ही एकापेक्षा अनेक विषयांशी संबंधित असल्याने माहिती अधिकारातील नियम ३ (क) नुसार एकाच विषयाची माहिती देण्यास जन माहिती अधिकारी हे बांधील आहेत. अन्य मुद्यांची माहिती हवी असल्यास स्वतंत्र अर्ज करावे लागेल अशी वस्तुस्थिती कळविली आहे. तसेच माहिती अर्जात नमूद केलेले विषय पाहता कुठली माहिती हवी आहे याचा बोध होत नाही. प्रथम अपिल अर्जाबाबत विचारणा केली असता तक्रारदार यांनी सांगितले की, प्रथम अपिल अर्ज केलेला नाही. जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे. त्यामुळे सदर तक्रार पुढील चौकशी योग्य नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

प्रस्तुत तक्रार क्रमांक १५७/२०२३/अहिल्यानगर निकाली काढण्यात येत आहे.

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

जावक क्र ४८९३

23 JUN 2025